News Paper Clippings 2020-21

२ पुढारी MY सांगली बुधवार, २ जून २०२१

# नवसमाज निर्मितीसाठी मूल्यशिक्षण गरजेचे : प्रा. चंद्रशेखर गिते

**किर्लोस्करवाडी : पुढारी वृत्तसेवा**

नवसमाज निर्मितीसाठी मूल्यशिक्षणाची गरज आहे, असे प्रतिपादन डॉ. चंद्रशेखर गित्ते यांनी केले.

रामानंदनगर (ता. पलूस) येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात राज्यशास्त्र विभाग यांच्यावतीने . गिते यांचे 'मानवी मूल्य' या विषयावर ऑनलाईन व्याख्यान झाले. सदर व्याख्यांनामध्ये प्रा. गिते यांनी मानवी मूल्याच्या संदर्भात विचार व्यक्त केला. असे नमूद केले. महाविद्यालयाचे प्राचार्य लक्ष्मण कदम अध्यक्षस्थानी होते.

उपप्राचार्य डॉ.व्ही. बी. पाटील, डॉ. के. बी. भोसले उपस्थित होते. डॉ. सचिन चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. डॉ. तेजस चव्हाण प्रा. दिनेश ससाने यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. नम्रता कांबळे यांनी आभार मानले.

सकाळ दि. १५/६/२०२१

सकाळ

# 'साने गुरुजींमुळे पिढी सुसंस्कृत

## महाले; रामानंदनगर महाविद्यालयात व्याख्यानमाला

सकाळ वृत्तसेवा

किर्लोस्करवाडी, ता.१५ : 'साने गुरुजींनी मराठी मनावर नैतिकतेचा संस्कार करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. ज्ञानेश्वर आणि तुकारामांच्या नंतर आपल्या परंपरेचे एक सर्वसमावेशक चित्र उभा करण्याची महान कृती साने गुरुजींनी आपल्या साहित्यातून केली आहे. सुसंस्कृत राष्ट्र निर्माण करण्यासाठी आवश्यक असणारे वाङ्मयीन कार्य गुरुजींनी आपल्या साहित्य लेखनातून केले आहे, असे मत डॉ. कैलास महाले यांनी व्यक्त केले.

रामानंदनगर येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाच्या वतीने साने गुरुजींच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित व्याख्यानमालेत ते बोलत होते. महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने 'साने गुरुजी व्यक्तित्व, जीवन आणि वाङ्मय' अशा विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. ते पुढे म्हणाले, "साने गुरुजींनी लोकसाहित्य, अनुवाद, संस्कृतिअभ्यास, कथा, कादंबरी, कविता, ललित लेखन यासारखे भरीव वाङ्मयीन कार्य करून ही मराठी समीक्षेने त्यांना उपेक्षित ठेवले. तसेच एक किसान- कामगार आणि अस्पृश्यांसाठी झटणारा एक कृतिशील समाजसुधारक असतानाही महाराष्ट्राकडून त्यांच्या वाट्याला उपेक्षाच आली. ही गोष्ट खरोखर चिंतनीय आहे." असे विचार मांडत त्यांनी साने गुरुजींच्या जीवनातील अलक्षित पैलूंवर प्रकाश टाकला.

प्राचार्य डॉ. एल. डी. कदम म्हणाले, "साने गुरुजी यांच्या संवेदनशील, सहृदयी स्वभावामागे त्यांच्या आईचे खूप मोठे संस्कार होते. खरा तो एकची धर्म प्रार्थना लिहणाऱ्या साने गुरुजींनी खऱ्या अर्थाने भारतीय मुलांना आदर्श राष्ट्रनिर्मितीचे संस्कार दिले. ऑनलाईन व्याख्यानासाठी उपप्राचार्य डॉ. व्ही. बी. पाटील आणि डॉ. काकासाहेब भोसले यांच्यासह सर्व अध्यापक, सेवकवृंद आणि महाविद्यालयाचे विद्यार्थी उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. तेजस चव्हाण, आभार मराठी विभागप्रमुख प्रा. दिलीप कोने, तर आभार प्रा. स्वाती मगदूम यांनी केले. तंत्रसहाय्य प्रा. दिनेश ससाणे यांनी केले.

Sangli, Sangli-Today
16/06/2021 Page No. 4

२ पुढारी MY सांगली सोमवार, १४ जून २०२१

# साने गुरुजींनी सुसंस्कृत राष्ट्र निर्माण केले

## डॉ. कैलास महाले; डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात व्याख्यानमाला

**किर्लोस्करवाडी : पुढारी वृत्तसेवा**

'साने गुरुजींनी मराठी मनावर नैतिकतेचा संस्कार करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. ज्ञानेश्वर आणि तुकारामांच्यानंतर आपल्या परंपरेचे एक सर्वसमावेशक चित्र उभे करण्याची महान कृती साने गुरुजींनी आपल्या साहित्यातून केली आहे, असे मत डॉ. कैलास महाले यांनी व्यक्त केले.

ते रामानंदनगर (ता. पलूस) येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाच्या वतीने साने गुरुजींच्या ' स्मृतिदिनानिमित्त आयोजित व्याख्यानमालेत बोलत होते.

महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने 'साने गुरुजी : व्यक्तिमत्व, जीवन आणि वाङ्मय' अशा विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

ते पुढे म्हणाले, 'साने गुरुजींनी लोकसाहित्य, अनुवाद, संस्कृतिअभ्यास, कथा, कादंबरी, कविता, ललित लेखन यासारखे भरीव वाङ्मयीन कार्य करून ही मराठी समीक्षेने त्यांना उपेक्षित ठेवले. तसेच एक किसान- कामगार आणि अस्पृश्यांसाठी झटणारा एक कृतिशील समाजसुधारक असतानाही महाराष्ट्राकडून त्यांच्या वाट्याला उपेक्षाच आली. ही गोष्ट खरोखर चिंतनीय आहे.'

प्राचार्य डॉ. लक्ष्मण कदम अध्यक्षस्थानी होते. उपप्राचार्य डॉ. व्ही. बी. पाटील आणि डॉ. काकासाहेब भोसले उपस्थित होते. डॉ. तेजस चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. मराठी विभागप्रमुख प्रा. दिलीप कोने यांनी स्वागत केले. प्रा. स्वाती मगदूम यांनी आभार केले. तंत्रसहाय्य प्रा. दिनेश ससाणे यांनी केले.

लोकमत दि १४/६/२०२१

# साने गुरुजी सुसंस्कृत राष्ट्र निर्माण करणारे शिक्षक

## कैलास महाले : रामानंदनगरला व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

**दुधोंडी :** साने गुरुजींनी मराठी मनावर नैतिकतेचा संस्कार करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. सुसंस्कृत राष्ट्र निर्माण करण्यासाठी आवश्यक असणारे वाङ्मयीन कार्य लेखनातून केले असल्याचे मत डॉ. कैलास महाले यांनी व्यक्त केले.

ते रामानंदनगर (ता. पलूस) येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाच्यावतीने साने गुरुजींच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित ऑनलाईन व्याख्यानमालेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एल. डी. कदम होते.

डॉ. महाले म्हणाले की, साने गुरुजींनी भरीव वाङ्मयीन कार्य करूनही मराठी समीक्षेने त्यांना उपेक्षित ठेवले. किसान-कामगार आणि अस्पृश्यांसाठी झटणारा कृतिशील समाजसुधारक असतानाही महाराष्ट्राकडून त्यांच्या वाट्याला उपेक्षाच आली.

उपप्राचार्य डॉ. व्ही. बी. पाटील, डॉ. काकासाहेब भोसले उपस्थित होते. डॉ. तेजस चव्हाण यांनी प्रास्ताविक, तर प्रा. दिलीप कोने यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. स्वाती मगदूम यांनी आभार मानले.

Hello Sangli
Page No. 4 Jun 14, 2021
Powered by: erelego.com

सकाळ

सोमवार,
३१ मे २०२१

२

# डॉ. कदम महाविद्यालयातर्फे ऑनलाईन व्याख्यान

**सकाळ वृत्तसेवा**

दुधोंडी, ता. ३० : रामानंदनगर (ता. पलूस) येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागाच्यावतीने डॉ. चंद्रशेखर गित्ते (नागपूर) यांचे 'मानवी मूल्य' विषयावर ऑनलाइन व्याख्यान झाले.

प्रा. गित्ते यांनी मानवी मुल्याच्या संदर्भात विचार मांडले. नवसमाज निर्मितीसाठी मुल्यशिक्षणाची गरज आहे, असे नमुद केले. प्राचार्य लक्ष्मण कदम अध्यक्षस्थानी होते. राष्ट्रनिर्मीतीसाठी मूल्य शिक्षणाची खरी गरज आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले. उपप्राचार्य

डॉ. व्ही. बी. पाटील, डॉ. के. बी. भोसले उपस्थित होते. डॉ. सचिन चव्हाण यांनी प्रास्ताविक व ओळख करून दिली. डॉ. तेजस चव्हाण यांनी सुत्रसंचालन केले. प्रा. दिनेश ससाणे यांनी तंत्र सहाय्य केले. प्रा, नम्रता कांबळे यांनी आभार

मानले. विद्यार्थी, प्राध्यापक सहभागी होते.

सकाळ TODAY

१२ मे २०२१



रामानंदनगर : येथे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना अभिवादन करताना जे. के. बापू जाधव, महेंद्र आप्पा लाड व अन्य मान्यवर.

# रामानंदनगर येथे कर्मवीरांना अभिवादन

**दुधोंडी** : रामानंदनगर (बुर्ली) महाविद्यालयात कर्मवीर भाऊराव पाटील यांची ६२ वी पुण्यतिथी साजरी करण्यात आली. कोरोना काळामुळे अत्यंत साध्या पद्धतीने पुण्यतिथी साजरी करण्यात आली. यावेळी कर्मवीर अण्णांच्या प्रतिमेस आणि महाविद्यालय परिसरातील प्रतिकृतीस मान्यवरांच्या हस्ते पुष्पांजली अर्पण करण्यात आली. यावेळी महाविद्यालय विकास समितीचे सदस्य जे. के. जाधव आणि महेंद्र लाड, सुधीर जाधव, उपस्थित होते. याशिवाय रयत शिक्षण संस्थेचे माजी सहसचिव जी. ए. खोत, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. कदम, स्वा. रा. विद्यालयाचे मुख्याध्यापक एस. एस. पाटील, ल. भा. पा. कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका एल. एस. पाटील, युवक काँग्रेस पलूस-कडेगाव विधानसभा क्षेत्राचे अध्यक्ष मा. प्रमोद जाधव, उद्योजक प्रमोद सगरे आणि महाविद्यालयीन सेवकवृंद उपस्थित होते.

पुढारी दि. 13 मार्च 2021

# डॉ. कदम महाविद्यालयात विज्ञानदिन

**किर्लोस्करवाडी :** रामानंदनगर (ता. पलूस) येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञानदिन साजरा करण्यात आला. तज्ज्ञांचे व्याख्यान व विज्ञान प्रदर्शन झाले. डॉ. सी. व्ही. रामन यांच्या प्रतिमेचे पूजन झाले. प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. डी. डी. नामदास यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन समाजात रुजला पाहिजे, असे प्रतिपादन केले. प्रा. डॉ. यु. बी. मोरे यांनी संशोधन भित्तीपत्रक बनविण्याबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली. प्राचार्य डॉ. लक्ष्मण कदम यांनी विज्ञान क्षेत्रातील विकासाची माहिती दिली. अध्यक्ष यू. एस. शेळके यांनी प्रास्ताविक केले. डॉ. वनिता राऊत यांनी परिचय करुन दिला. प्रा. स्नेहा वाघ यांनी आभार मानले. प्रा. नम्रता कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. उपप्राचार्य डॉ. व्ही. बी. पाटील, डॉ. के. बी. भोसले उपस्थित होते. विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी ५६ पोस्टर्स व १६ प्रतिकृती सादर केल्या.

सकाळ | सांगली सांगली, बुधवार, १० मार्च २०२१

# डॉ. कदम महाविद्यालयात विज्ञान प्रदर्शन



रामांनंदनगर : विज्ञान प्रदर्शनाचे उद्‌घाटन करताना डी. डी. नामदास, प्राचार्य डॉ. एल. टी. कदम आदी.

किर्लोस्करवाडी, ता. ९ : रामानंदनगर येथे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन झाला. सायन्स असोसिएशन, रिसर्च प्रमोशन कमिटी व आय. क्यु. ए. सी. यांच्या विद्यमाने तज्ञांचे व्याख्यान व विज्ञान प्रदर्शन झाले.

नोबेल विजेचे डॉ. सी. व्ही. रामन यांच्या प्रतिमेचे पूजन झाले. डॉ. डी. डी. नामदास यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन समाजात रुजला पाहिजे, असे प्रतिपादन केले. 'शास्त्राचे मूळ व मुळामागील शास्त्र' यावर त्यांनी विवेचन दिले. दुसरे व्याख्यान डॉ. यु. बी. मोरे यांनी संशोधन भित्तीपत्रक बनविण्याबाबत विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले. प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांनी विज्ञानातील विकासासंदर्भात धावता आढावा घेतला. सायन्स असोसिएशने चेअरमन यु. एस. शेळके यांनी प्रास्ताविक केले. रिसर्च कमिटीचे चेअरमन डॉ. वनिता राऊत यांनी पाहुण्यांची ओळख करुन दिली. प्रा. स्नेहा वाघ यांनी आभार मानले. प्रा. नम्रता कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. उपप्राचार्य डॉ. व्ही. बी. पाटील व डॉ. के. बी. भोसले उपस्थित होते.

विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी ५६ पोस्टर्स व १६ प्रतिकृती सादर केल्या. पोस्टर व मॉडेलचे परीक्षण करण्यात आले. मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. या उपक्रमातून वैज्ञानिक दृष्टिकोन रुजत आहे, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले. प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजन झाले.

केसरी
दि. 07-03-2021



डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात 'हास्ययात्रा' या एकपात्री विनोदी कार्यक्रमाचे सादरीकरण करताना शरद जाधव

# मातृभाषेतच जीवनाचे खरे ज्ञानसंचित : शरद जाधव

**केसरी वृत्तसेवा**

**पलूस :** जीवनातील खरा आनंद शोधण्यासाठी माणसाने स्वतः ला मातृभाषेबरोबर जोडून घेतले पाहिजे. भाषेतील छोट्यामोठ्या गमतीजमतीतूनच माणसाला सात्त्विक आनंद मिळू शकतो, असे प्रतिपादन हास्ययात्राकार शरद जाधव यांनी केले. रयत शिक्षण संस्थेच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय रामानंदनगर येथे मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमांमध्ये ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. कदम होते. प्रारंभी मान्यवरांच्याहस्ते कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. पतंगराव कदम, कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. यावेळी त्यांनी एकपात्री विनोदी कार्यक्रम 'हास्ययात्रा'चे सादरीकरण करून विद्यार्थ्यांचे निखळ मनोरंजन केले. प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमासाठी उपप्राचार्य डॉ. व्ही. बी. पाटील, डॉ. काकासाहेब भोसले, लेखक संदिप नाझरे आदी मान्यवरासह महाविद्यालयातील सेवक वृंद, विद्यार्थी उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. तेजस चव्हाण, आभार मराठी विभागप्रमुख दिलीप कोने यांनी, तर सूत्रसंचालन प्रा. स्वाती मगदूम यांनी केले.

पुढारी दि. 06-03-2021

## रामानंदनगर येथे रक्तदान शिबिर

किर्लोस्करवाडी : पुढारी वृत्तसेवा

रामानंदनगर (ता. पलूस) येथील ए. एस. सी. कॉलेजमध्ये माजी मंत्री (स्व.) डॉ. पतंगराव कदम यांच्या स्मृतिदिनानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी महेंद्र लाड, जे. के. (बापू) जाधव यांनी भेट दिली. प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिराचे संयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये एन. सी. सी, एन.एस.एस या विभागाने सहभाग घेतला. शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, राष्ट्रीय छात्र सेनेचे कॅडेट व विद्यार्थ्यांनी रक्तदान केले.

# रामानंदनगर येथे रक्तदान शिबिर

**किर्लोस्करवाडी : पुढारी वृत्तसेवा**

रामानंदनगर (ता. पलूस) येथील ए. एस. सी. कॉलेजमध्ये माजी मंत्री (स्व.) डॉ. पतंगराव कदम यांच्या स्मृतिदिनानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी महेंद्र लाड, जे. के. (बापू) जाधव यांनी भेट दिली. प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिराचे संयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये एन. सी. सी, एन.एस.एस या विभागाने सहभाग घेतला. शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, राष्ट्रीय छात्र सेनेचे कॅडेट व विद्यार्थ्यांनी रक्तदान केले.

लोकमत दि. २१ जनवरी, २०२१

# हत्येने विवेक दाबला जाऊ शकत नाही

## उदय चव्हाण : रामानंदनगर महाविद्यालयात 'अंनिस'चे प्रात्यक्षिक

लोकमत न्यूज नेटवर्क

**सावंतपूर** : नरेंद्र दाभोलकर, गोविंद पानसरे, कलबुर्गी, गौरी लंकेश यांच्या हत्येने विवेकाचा आवाज दाबला जाऊ शकत नाही, तर शिक्षणाने तो आणखी बुलंद होईल. माणसे मेली तरी विचार मरत नसतात, असे प्रतिपादन 'अंनिस'चे उदय चव्हाण यांनी केले.

रामानंदनगर (ता. पलूस) येथील रयत शिक्षण संस्थेच्या आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेजमध्ये राष्ट्रीय सेवा योजना आणि विवेक वाहिनी यांच्या संयुक्त विद्यमाने 'चला विचार तरी करूयात' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. प्राचार्य एल. डी. कदम यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास पक्षिमित्र संदीप नाझरे, प्रा. काकासाहेब भोसले, आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी संदीप नाझरे यांनी पक्षी आणि अंधश्रद्धा यावर मार्गदर्शन केले, तर चव्हाण यांनी अंधश्रद्धा निर्मूलनवर प्रात्यक्षिके सादर केली. चव्हाण म्हणाले. अंधश्रद्धेच्या जोखडातून बाहेर पडण्यासाठी शिक्षणाची कास धरावी लागेल.

आपली जन्मदात्री आई आणि वडील हेच आपले दैवत आहेत, तर सावित्रीबाई फुले याच शिक्षणाच्या खऱ्या देवता आहेत. स्वतःला चांगल्या विचारांचा लगाम घाला, तरच तुम्ही चांगली व्यक्ती बनाल. कर्मकांडात न अडकता विवेकाने वागा. विचारांना विवेकाची, विज्ञानाची जोड दिल्यास अंधश्रद्धा निर्मूलन सहज शक्य आहे.

Hello Sangli
Page No. 4 Jan 21, 2021
Powered by: erelego.com

लोकमत
गुरुवार २१.१.२०२१
हॅलो सांगली
epaper.lokmat.com

# हत्येने विवेक दाबला जाऊ शकत नाही

## उदय चव्हाण : रामानंदनगर महाविद्यालयात 'अंनिस'चे प्रात्यक्षिक

लोकमत न्यूज नेटवर्क

सावंतपूर : नरेंद्र दाभोलकर, गोविंद पानसरे, कलबुर्गी, गौरी लंकेश यांच्या हत्येने विवेकाचा आवाज दाबला जाऊ शकत नाही, तर शिक्षणाने तो आणखी बुलंद होईल. माणसे मेली तरी विचार मरत नसतात, असे प्रतिपादन 'अंनिस'चे उदय चव्हाण यांनी केले.

रामानंदनगर (ता. पलूस) येथील रयत शिक्षण संस्थेच्या आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेजमध्ये राष्ट्रीय सेवा योजना आणि विवेक वाहिनी यांच्या संयुक्त विद्यमाने 'चला विचार तरी करूयात' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. प्राचार्य एल. डी. कदम यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास पक्षिमित्र संदीप नाझरे, प्रा. काकासाहेब भोसले, आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी संदीप नाझरे यांनी पक्षी आणि अंधश्रद्धा यावर मार्गदर्शन केले, तर चव्हाण यांनी अंधश्रद्धा निर्मूलनवर प्रात्यक्षिके सादर केली. चव्हाण म्हणाले. अंधश्रद्धेच्या जोखडातून बाहेर पडण्यासाठी शिक्षणाची कास धरावी लागेल.

आपली जन्मदात्री आई आणि वडील हेच आपले दैवत आहेत, तर सावित्रीबाई फुले याच शिक्षणाच्या खऱ्या देवता आहेत. स्वतःला चांगल्या विचारांचा लगाम घाला, तरच तुम्ही चांगली व्यक्ती बनाल. कर्मकांडात न अडकता विवेकाने वागा. विचारांना विवेकाची, विज्ञानाची जोड दिल्यास अंधश्रद्धा निर्मूलन सहज शक्य आहे.

सकाळ TODAY
शुक्रवार, १५ जानेवारी २०२१

# सांगली जिल्ह्याच्या विकासात पतंगरावांचे योगदान : डॉ. कदम

सांगली, ता. १४ : रामानंदनगर (बुर्ली) येथील आर्टस सायन्स अँड कॉमर्स कॉलेजच्या राज्यशास्त्र विभागातर्फे स्वर्गीय पतंगराव कदम यांच्या ७७ व्या जयंती निमित्त महाविद्यालयांमध्ये व्याख्यान आयोजित केले होते.

कार्यक्रमामध्ये बोलताना कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांनी पतंगराव कदम यांनी सांगली जिल्ह्यामध्ये केलेल्या सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक, सहकार इत्यादी क्षेत्रांमध्ये बहुमोल योगदान दिल्याचे विशद केले. तसेच प्रत्येक वर्षी महाविद्यालयामध्ये पतंगराव कदम साहेब यांच्या विषयी जयंतीनिमित्त व्याख्यान आयोजित करण्याचा मनोदय व्यक्त केला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे प्राध्यापक मधुकर पाटील (सिनेट सदस्य, शिवाजी विद्यापीठ) उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना पतंगराव कदम यांच्या कार्या विषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.व्ही.बी. पाटील, डॉ.के.बी.भोसले उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सचिन चव्हाण यांनी केले तर सूत्रसंचालन विद्यार्थिनी नम्रता चोगले हिने केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी, नागरिक मोठ्यासंख्येने उपस्थित होते.



रामानंदनगर : येथील महाविद्यालयात पतंगराव कदम यांना अभिवादन करण्यात आले.

हॅलो प्रभात
दि. 13-01-2021

## डॉ. पतंगराव कदम यांना रामानंदनगर कॉलेजमध्ये अभिवादन

**कुंडल :: हॅलो प्रभात**

रयत शिक्षण संस्थेच्या ए एस सी कॉलेज रामानंदनगर (बुर्ली)मध्ये स्वर्गीय आमदार डॉ. पतंगराव कदम साहेब यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. डॉ पतंगराव कदम यांच्या जयंतीनिमित्त महाविद्यालयामध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहेत यामध्ये रक्तदान शिबिर, डॉ पतंगराव कदम साहेब यांच्यावर व्याख्यान इत्यादी कार्यक्रम होणार आहेत

या कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ एल डी कदम व सहकारी प्राध्यापक विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

सकाळ
सांगली, गुरुवार, ७ जानेवारी २०२१

## किर्लोस्करवाडीत रक्तदान शिबिर

**किर्लोस्करवाडी :** रामानंदनगर येथील ए. एस. सी. महाविद्यालयात स्व. आमदार डॉ. पतंगराव कदम यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी महाविद्यालय विकास समितीचे सदस्य महेंद्र (आप्पा) लाड उपस्थित होते. महाविद्यालय विकास समितीचे सदस्य जे. के. (बापू) जाधव यांनी भेट दिली. प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिराचे संयोजन झाले. एनसीसी, एनएसएसच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

सकाळ
शनिवार, ९ जानेवारी २०२१

## डॉ. पतंगराव कदम यांना अभिवादन

किर्लोस्करवाडी, ता. ८ : रयत शिक्षण संस्थेच्या ए. एस. सी. कॉलेज रामानंदनगर (बुर्ली) येथे स्व. आमदार डॉ. पतंगराव कदम यांना त्यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. प्राचार्य डॉ. एल. डी. कदम व प्राध्यापक विद्यार्थी उपस्थित होते.

सकाळ

दि. 07-01-2021

# किर्लोस्करवाडीत रक्तदान शिबिर

**किर्लोस्करवाडी :** रामानंदनगर येथील ए. एस. सी. महाविद्यालयात स्व. आमदार डॉ. पतंगराव कदम यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी महाविद्यालय विकास समितीचे सदस्य महेंद्र (आप्पा) लाड उपस्थित होते. महाविद्यालय विकास समितीचे सदस्य जे. के. (बापू) जाधव यांनी भेट दिली. प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिराचे संयोजन झाले. एनसीसी, एनएसएसच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.